ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# सायबर गुन्हे आणि महिला व बालसुरक्षा एक आढावा

**डॉ. विलास चव्हाण**
समाजशास्त्रे विभाग प्रमुख, शंकरराव चव्हाण महाविद्यालय,
अर्धापूर, जि.नांदेड

★★★

**सारांश** – आजच्या डिजीटल युगात इंटरनेटच्या. माध्य मातून जगाच्याड काणा–कोपऱ्यातील माणस संवाद साधतांना दिसून येत आहेत. आपल्याच वैयक्तिक आवडी–निवडी, वेगळेपण गुप्तं ठेऊन व्यहक्त. होण्याघ्साठी समाजमाध्य–मांचा खूप मोठ्या प्रमाणात वापर होतांना दिसून येत आहे. हिच समाजमाध्योम मात्र स्त्रियां आणि लहान मुलांसाठी अत्यंसत घातक ठरत आहेत. सायबर गुन्हेंगार आपली विकृत इच्छाल पूर्ण करण्या साठी समाजातील असाहय असलेला घटक म्हंणजे स्त्रिया आणि लहान मुलं टार्गेट करताना दिसून येतो. याचा परिणाम म्हीणून महिला आणि बालकांच्याल लैंगिक छळाच्यो घटना वाढत आहेत. सायबर गुन्हेंणगारीमुळे महिला आणि बालकांच्याा आत्मसहत्येहचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

**प्रस्ताणवना :** मानवी समाजाइतकीच गुन्हें गारी प्राचीन असून कोणताही मानव समाज गुन्हेंमगारी मुक्तह नाही. गुन्हा ही एक सार्वत्रिक आणि अपरिहार्य अशी घटना आहे. एमिल डरखीम म्हंणतात गुन्हेंनगारीची समस्यार भेडसावत नाही असा एकही समाज नाही. त्यां च्यान प्रकार आणि वैशिष्ट यांमध्ये फरक असले इतकेच 1 सामाजिक कल्याणण, सामाजिक सुरक्षितता आणि जीवित व वित्तल गुन्हेंगारीमुळे धोक्याकत आलेले दिसून येते. इतकेच नव्हें तर वाढत्याव गुन्हेंगारीमुळे समाजशास्त्रयज्ञ, पोलिस व कायदेशीर यंत्रणेची डोकेदुखी वाढलेली आहे. स्थ्ल–कला–समाज परत्वेंबिदलणारी गुन्हीय ही एक गूढ अषी संकल्प्ना असून वेगवेगळ्या अभ्याळसकांनी त्यापचा वेगवेगळा अर्थ लावलेला आहे. गुन्हवयांची संकल्पलना समजून घेण्यामध्येव कायदा महत्वाआचा घटक असून या संकल्पेनेनुसार प्रचलित कायद्याचे उल्लंयघन करणे म्हमणजे गुन्हाक असे म्हलणता येईल.

पॉल तपन यांच्याा मते गुन्हा म्हेणजे हेतूतः केलेले कृत्य की जे केल्यानने फौजदारी कायद्याचे उल्ल्धंन होते. कोणतेही संरक्षण किंवा समर्थनाशिवाय असे कृत्यर केलेले असते आणि त्यां कृत्याहला गंभीर किंवा सौम्यन अपराध म्हीणून राज्यआसंस्थेतची **मान्यणता असते.**

**2 सायबर गुन्हाय म्हाणजे काय** – गेल्याग काही दषकात माहिती तंत्रज्ञानाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. या विकासाचा प्रारंभ 1980 नंतर झाला. आधुनिक तंत्रज्ञानाच्यां युगात इंटरनेट एक सर्वश्रेष्ठा अविष्कार म्हरणून वापरला जातो. इंटरनेटच्या माध्यमातून जग अगदी लहान झालेले दिसून येते. काही क्षणातच आपण जगातील सर्व माहिती सर्फिंग करून घेऊ शकतो. वास्तविक पाहता तंत्रज्ञानही मानवाच्या प्रगतीसाठी वापरली जाणारी वस्तू आहे. परंतु काही मंडळी तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करून विविध प्रकारे गुन्हे करतात त्या गुन्ह्याला सायबर गुन्हा असे म्हणतात. सायबर गुन्हा हा पारंपरिक गुन्ह्याप्रमाणेच असतो फक्त तो सायबर स्पेसमध्ये इलेक्ट्रॉ निक व संगणकीय वातावरणात केलेला असतो, म्हणून त्यास सायबर गुन्हा म्हणतात. संगणक, इंटरनेट आणि मोबाईलचा वापर करून किंवा त्यांना टार्गेट करून केलेले गुन्हे म्हणजे सायबर गुन्हे होय.

प्रा.एन.व्हीय. परांजपे यांच्या मते, सायबर गुन्हा म्हणजे असा गुन्हा की जो संगणकाचा वापर करून केला जातो. या गुन्ह्यात संगणकाचा वापर माध्यम म्हणून लक्ष साध्य करण्यासाठी म्हणून किंवा पुन्हा अपराध करण्याचे साधन म्हणून केला जातो. आज आधुनिक काळात तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे माणूस त्याच्या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी इंटरनेटवर अवलंबून आहे. इंटरनेटचा विकास आणि फायद्यामुळे सायबर गुन्ह्यांमध्ये देखील वाढ होताना दिसून येत आहे.

**सायबर गुन्ह्याचे प्रकार :**– संगणकीय क्षेत्रात आज सायबर गुन्ह्यांचा झालेला शिरकावा अनेक संकटांना आमंत्रण देणारा आहे. सायबर हल्ल्यापासून समाजातील कोणतीही व्यक्ती अलिप्त असलेली दिसून येत नाही. कारण प्रत्येक व्यक्तीला रोजच या सायबर गुन्ह्या चा सामना करावा लागत आहे. आपल्या ई–मेलवर अनेक प्रकारचे स्पॅममेल येतात. मोबाईल वर वेगवेगळ्या ऑफरचे लॉटरी लागल्याचे संदेश व कॉल येतात. ऑनलाईन बँकिंग व्यवहार असतील तर त्याचा पासवर्ड आयडी हॅक होतो. हे सर्वच प्रकार सायबर गुन्हेगारीत मोडतात. हॅकिंग, सायबर स्टॉकिंग, व्हा.यरस ॲटक, पोनोग्राफी डेनायल ऑफ सर्विस ॲटक, व्हाकरसडेसीमिनेशन (व्हाययरसमुळे विध्वीसंक) क्रेडीट कार्ड फ्रॉड, नेट एक्ट्रॉत रशन, पिशींग, चाईल्ड पोनोग्रॉफी इत्यादी माध्यमांचा वापर करून सायबर गुन्हेगार लोकांची फसवणूक करतो. देशात 2019 मध्ये 51 लाख 56 हजार 172 एकूण गुन्हे दाखल झाले आहेत. यामध्ये 44 हजार 556 सायबर गुन्हे आहेत. देशात 2018 मध्ये 27 हजार 248 सायबर गुन्हे घडलेले होते. यावर्शी 63 टक्यांनी सायबर गुन्ह्यात वाढ झाली. देशात सर्वाधिक सायबर गुन्हे कर्नाटकात दाखल झाले असून महाराष्ट्र सायबर गुन्ह्या त तिसऱ्या स्थानकावर आहे. तर मुंबई शहर देशात दुसऱ्या स्थानावर असल्याचे दिसून आले. सायबर गुन्ह्यात सर्वाधिक गुन्हेंश 26891 हे फसवणुकीच्या संदर्भातील आहेत. त्यानंतर लैंगिक छळाच्या उद्देशाने 2 हतार 266 गुन्हे घडले.3 राष्ट्रीय गुन्हे नोंदणी नोंदणी यंत्रणा (एन सी आर पी) यांच्या अहवालानुसार 1–3–2020 ते 18–9–2020 मध्ये राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टलवर चाईल्ड पॉर्नोग्राफी, बलात्कार

आणि सामूहिक बलात्काराच्या दाखल झालेल्या तक्रारीची एकूण संख्या 13244 एवढी आहे.

**सायबर गुन्हे आणि महिला व बालकांची स्थिती** : आज आधुनिक काळात स्मार्टफोन, इंटरनेट सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलेला असून त्याळचा वापर वाढत असलेला दिसून येतो. वाढत्या इंटरनेटच्या वापराचा परिणाम म्हणून काही विकृत प्रवृत्तीची माणसे त्याचा गैरवापरही करताना दिसून येतात. त्यातल्या त्यात महिला आणि लहान मुले हे त्यांचे सोपे लक्ष (सॉफ्ट टार्गेट) असते. स्त्रिया मुख्यतः सोशल नेटवर्किंग वेबसाईट वापरासाठी आणि ऑनलाईन खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात मोबाईलचा वापर करतात तर लहान मुलं ऑनलाइन गेम व कुतूहल म्हणून अलील क्लिप पाहण्यासाठी मोबाईलचा वापर करतात. एखाद्या परिस्थितीत आपला फोन हरवला, गहाळ झाला किंवा दुरुस्तीसाठी दिला असता त्यामधील संवेदनशील माहिती ही सायबर गुन्हेंगाराच्या हाती लागल्यास गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. केवळ आपल्या फोनमध्ये असलेले पाहून कुणालाही आपल्या वयाच, लिंगाचा, ठिकाणाचा, आवडीचा व इतर वैयक्तिक रुचीचा अंदाज सायबर गुन्हेगार करत असतो. सामाजिक माध्यंमामुळे माहितीचे जग सर्वांसाठी खुले झालेले आहे. मित्र–मैत्रिणी समान विचार व आवडीनिवडी असणारे लोक एकमेकांच्या सतत ऑनलाइन संपर्कात येतात. त्याच बरोबर आपली स्वतःची ओळख उघड न करता किंवा गोपनीयता राखून आपापली इतरांपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण असलेली रूची किंवा आवड पूर्ण करण्यासाठी त्याच विचाराचे मित्र–मैत्रिणी बनवल्या जातात. मात्र याच माध्यमातून कळत नकळत स्त्रिया सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकले जातात आणि त्यांचे आर्थिक आणि लैंगिक शोषण केले जाते.

**सायबर बुलिंग** : एखाद्या व्यक्तीची बदनामी करण्याच्या उद्देशाने किंवा मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने ई–मेल, इन्स्टंट मेसेजिंग, एसएमएस मोबाईल सोशल नेटवर्कींग साईट, वेबसाईट यांचा वापर करून त्या व्यक्तीला घाबरविणे किंवा त्या व्यक्तीची बदनामी करणे या प्रकाराला सायबर बुलिंग म्हणतात. स्त्रिया आणि लहान मुले या सायबर बुलिंगचे खूप मोठ्या प्रमाणात शिकार होतात.

**ई–मेल द्वारे होणारा छळ** : महिला आणि बालकांना टार्गेट करण्याचे एक अत्यंत महत्त्वाचं माध्यम म्हणजे ई–मेल. सायबर गुन्हेगारांसाठी ई–मेल हे आवडते साधन बनले आहे. सायबर गुन्हेगार सामान्यपणे व्यवस्थापक मित्र आणि अगदी पती–पत्नीकडून धोकादायक ई–मेल पाठवू शकतात. सायबर गुन्हेंगार आकर्शक ई–मेल व्दापरे महिलांना आपले लक्ष्य करतात. बहुतेक महिलांना नकली ई–मेल्स पाठवून भेटवस्तू किंवा धमकावण्याचे संदेश देऊन लक्ष केले जाते.

**अष्लील मेसेज पाठवून बदनामी करणे** : काही विकृत प्रवृत्तीची माणसे आपली विकृत इच्छा पूर्ण करण्यासाठी महिलांना अश्लील मेसेज असले फोटो आणि व्हिडिओ पाठवून त्यांची बदनामी करण्याचा प्रयत्न करतात. तसेच फोनवरील अश्लील संभाषण रेकॉर्ड व्हामयलर करणे वैयक्तिक फोटो व्हा.यलर करण्याची धमकी देऊन आपली विकृत इच्छा पूर्ण करतात. सायबर स्टॉकिंग (सायबर विश्वातून होणारा पाठलाग) आधुनिक काळातील हा सर्वाधिक चर्चित सायबर गुन्हा म्हणावा लागेल. यामध्ये सातत्याने ठराविक महिलेवर लक्ष ठेवले जाते किंवा तिचा पाठलाग केला जातो. सतत मेसेज पाठविणे, ई–मेल्स पाठविणे किंवा ती महिला वापरत असलेले चॅट रुम्स यामध्ये प्रवेष करणे इत्यादी प्रकारांनी त्या महिलेवर इंटरनेटवरील सर्व हालचालीवर पाळत ठेवली जाते. बहुतेक वेळा महिला व मुले सायबर गुन्हेगारीचे बळी ठरतात.

**खाजगी माहितीचा वापर करून छळ** : एखाद्या स्त्री चा बदला घेण्यासाठी किंवा आपली विकृत इच्छा पूर्ण करण्यासाठी वैयक्तिक माहितीचा वापर सायबर गुन्हेगार करतात. यात समाज माध्यमावरील संबंधित महिलेचे खाते हॅक करून तीची खाजगी माहिती मिळवणे, फोन नंबर मिळवणे व त्यावरील वैयक्तिक फोटो व इतर मजकूर गोळा करणे आणि समाज माध्यमावर प्रसारित करणे. तसेच तरुण मुलं आणि मुली जेव्हा रिलेशनशिपमध्ये असतात तेव्हा अनेक मुलीचे खाजगी क्षण शूट केले जातात. खाजगी संबंधाचे फोटो काढले जातात आणि नंतर आपली लैंगिक इच्छा पूर्ण करण्यासाठी सदरील खाजगी क्षण प्रसारित करण्याची धमकी देऊन आपली इच्छा पूर्ण करून घेतात.

**ऑनलाईन जोडीदार निवडीतून फसवणूक** : सध्याच्या डिजिटल झालेल्या युगात लग्न जुळवण्याची पारंपारिक पद्धतही ऑनलाईन झालेली आहे. तसेच लग्न देखील ऑनलाईन ठरवले जात आहे. तर काही विवाह ऑनलाईन होत आहेत. परंतु मॅट्रिमोनियल साईटचा वापर करून फसवणूक करणार्याल भामट्यांची संख्या वाढलेली दिसून येते. फेसबुकवर जसे फेक अकाउंट बनवले जातात. त्याच पद्धतीने मॅट्रिमोनियल साइटवर ही फेक प्रोफाईल बनवली जातात. त्या फेक प्रोफाईलच्या माध्यमातून समोरच्याची चांगलीच फसवणूक होऊ शकते.

**सायबर पोर्नोग्राफी** : महिला नेटिझन्ससाठी ही आणखी एक महत्त्वाची समस्या आहे. यामध्ये पोर्नोग्रफिक वेबसाइट, संगणकाचा वापर करत निर्मिलेली फोनोग्रफी इंटरनेट वरील अश्लील चित्र, छायाचित्र किंवा मजकूर डाऊनलोड करणे याचा समावेश होतो. संबंधित महिलेचा चेहरा अश्लील फोटोला लावणे किंवा अश्लील चित्रफितीतील महिलेच्या चेहऱ्यावर आपण ज्या महिलेची बदनामी करणार आहोत तिच्या चेहऱ्याला लावणे असले प्रकार यामध्ये येतात याचाच परिणाम त्या महिलेची सर्वांगीण दृष्टीने कोंडी होते आणि ती सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात पडते.

## निष्कर्ष आणि शिफारस

1. इंटरनेट वापरताना आपली वैयक्तिक व गोपनीय माहिती कोणत्याही अनोळखी व्यक्ती अथवा वेबसाईटवर अपलोड करू नये.
2. महिलांनी आपल्याला आलेली अनोळखी अथवा फसवे मेसेजेस ई–मेल उघडू नये तसे कोणत्याही लिंक्स ला कॉपी किंवा क्लिक करू नये.
3. ऑनलाईन व्यवहार करताना अगदी सुरक्षितता बाळगण्यास हवी.
4. आपल्या वैयक्तिक नाजूक खाजगी क्षणांचा गैरवापर होऊ नये म्हणून असे शुटींग करणे टाळावे.
5. सोशल मीडिया डेटिंग आणि मॅट्रिमोनियल साइट्स वापरताना सावधगिरी बाळगली पाहिजे.
6. जर आपली फसवणूक होत आहे हे लक्षात आल्यावर ताबडतोब सायबर क्राईम विभागाकडे तक्रार दाखल करावी.
7. सायबर क्राईम विभागाने तक्रारीची दखल घेऊन ताबडतोब त्या सायबर गुन्हेगाराचा शोध घेऊन त्यास न्यायालयामार्फत शिक्षा दिली तर सायबर गुन्हेगारावर वचक बसेल आणि समाजातील महिला आणि बालकांच्या होणाऱ्या शोषणाला आळा बसेल.

## *संदर्भ सूची :*

1. *पी.के.कुलकर्णी, गुन्हें गारीचे समाजशास्त्रे, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्तीण, जून–2013.*
2. *https://vishvakosh-marathi-gov-in xqUgsa~'kkL=h-*
3. *https://mr-m Wikipedia-org सायबर गुन्हाह विकिपीडिया.*
4. *https://maharashtratime-com: 12 April 2020.*
5. *महिला आणि बालविकास मंत्रालय, नवी दिल्ली, 22 सप्टेंडबर 2020, स्मृती इराणी यांचे एका लेखी प्रश्ना ला उत्तलर.*
6. *https://pib-gov-पदमहिला अत्यानचार.*
7. *National Crime Records Bureau 3 – 2019.*